COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN DISTRICT जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दुरध्वनी : २६५५६७९९, फॅक्स : २६५५६८०५, ई -मेल : collectormsd@gmail.com

## परिशिष्ट "ब"

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब मधील तरतुदींन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटादारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, मौजे-एकसर, तालुका-बोरीवली जिल्हा-मुंबई उपनगर येथील स.नं. १६१/२/अ/१, न.भू.क्र.२८०५/अ या मिळकतीचे क्षेत्र ३८२.८० चौ.मी. या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब च्या तरतुदींन्वये निवासी अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका या नियोजन प्राधिकरणाच्या परमिशन टू ऑक्युपाय कम्प्लीटेड बिल्डिंग संबंधीत क्र.CHE/४९२२/BP(WS)AR, दिनांक २९/०१/२००१ अन्वये बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रूपांतरण कराची **रू.८,८०५/-**, दंडाची रक्कम **रू.७०,४४०/-** व अकृषिक कर सन- २०२१-२२ मधील **रू.१,७६१/-** रक्कम अशी एकूण **रू.८१,००६/-** इतकी रक्कम दि.२४/०३/२०२२ रोजी शासनास भरणा केलेली असून त्याबाबतची प्रत सादर केलेली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-ब अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास/ बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक ३१ जुलै रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **रू.१,७६१/- (अक्षरी रूपये एक हजार सातशे एकसष्ट मात्र)** निवासी रू.४.६०/- प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी अकृषिक कराची वार्षिक रक्कम उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर शासनास व संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे भरणा करील.

३) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करू नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४) उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल

अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

५) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब मधील तदतुदीअन्वये सदरची सनद देण्यात येत असली तरी, सदर सनदेत नमूद केलेली मिळकत भविष्यात भोगवटादार वर्ग-दोन या धारणाधिकाराची असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यासाठी प्रचलित तरतुदी विचारात घेतल्यानंतर शासनाकडे नियमानुसार देय असणारी नजराण्याची व शासनास देय असलेली अन्य रक्कम विहित कार्यपद्धती अवलंबून संबंधीत महसूल प्राधिकाऱ्याने मागणी केल्यास सदर रकमा शासनास जमा करणे ही संबंधित भोगवटादाराची जबाबदारी राहील आणि हे संबंधित भोगवटादारास मान्य आहे, असे संबंधित भोगवटादार यांनी हमीपत्र सादर करावे.

६) प्रस्तुतची सनद म्हणजे जमिनीचे मालकी हक्काचा पुरावा नाही. सदरची सनद नियोजन प्राधिकरणाने दिलेल्या विकास आराखडयातील अभिप्राय / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२-ब मधील तरतुदीनुसार निर्गमित केलेली आहे.

त्याची साक्ष म्हणून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक 09 /04/२०२२ रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

**क्रमांक:- सी/कार्या-७अ/एलएनडी/एनएपी/एसआरबी-११३३३**
**दिनांक: 01 / APR /२०२२ 2022**

For Suryadarshan Co-operative Housing Society Ltd.

D.L.Chalm

Secretary Chairman Treasurer

**सही/-**
**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**सुर्यदर्शन को.ऑप.हौ.सो.लि.**
**(भोगवटादाराचे नाव व स्वाक्षरी)**

आम्ही खाली नावे नमूद केलेले साक्षीदार जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर **सुर्यदर्शन को.ऑप.हौ.सो.लि.** म्हणून स्वाक्षरी केलेली आहे ही व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

① दिपक का. संखे DKsankhe
② निलेश प्र. कानवडे Nileshnw/c

**(साक्षीदारांची नावे व स्वाक्षरी)**

**प्रत:-**

१)तहसिलदार,बोरीवली/नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२) तलाठी, सजा एकसर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
३)निवड नस्ती.

COLLECTOR OF MUMBAI SUBURBAN जिल्हाधिकारी

(विकास गजरे)
**उपजिल्हाधिकारी (सा.प्र.)**
**मुंबई उपनगर जिल्हा**

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.